दिनांक - 26.10.2023

**-: जाहिरात :-**

**विषय : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित, कार्यालय क्र.1, तळमजला, रेवा चेंबर्स, न्यू मरिन लाईन्स, मुंबई येथे वरिष्ठ सल्लागार (वस्त्रोद्योग) या पदाकरिता कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित, मुंबई येथे वरिष्ठ सल्लागार (वस्त्रोद्योग) या 01 पदाकरिता कंत्राटी पद्धतीने 6 महिन्याकरिता दरमहा व्यावसायिक फीवर नियुक्तीसाठी खालील अर्हताप्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

1. उमेदवार वस्त्रोद्योग विभागातील उपसिचव पदावरील सेवानिवृत्त अधिकारी ज्यांचे वय 62 वर्षापर्यंत पाहिजे.
2. उमेदवारास सुरुवातीला 6 महिन्याकरिता कंत्राटी पद्धतीने दरमहा व्यावसायिक फीवर वस्त्रोद्योग महामंडळातर्फे नियुक्तीपत्र सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17 डिसेंबर, 2016, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 21.02.2018 आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100(भाग-1)/13, दिनांक 8 सप्टेंबर, 2023 नुसार देण्यात येईल.
3. उमेदवारास नियुक्ती देताना दरमहाच्या व्यावसायिक फीची गणना, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17 डिसेंबर, 2016 च्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100(भाग-1)/13, दिनांक 8 सप्टेंबर, 2023 नुसार (शासन निर्णय दि.17.12.2016 मधील परिच्छेद 2 येथील (ड) (1)(क) मध्ये सुधारणा केल्यानुसार) मासिक पारिश्रमिकाची येणारी रक्कम दरमहाची व्यावसायिक फी म्हणून लागू करण्यात येईल.
4. इच्छूक व पात्र उमेदवाराने वस्त्रोद्योग महामंडळाच्या खालील पत्त्यावर अर्ज सादर करण्याची शेवटची मुदत दि.03.11.2023, सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राहील.

**महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित,**
**कार्यालय क्र.1, तळमजला, रेवा चेंबर्स,**
**31, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,**
**न्यू मरिन लाईन्स, मुंबई 400 001**

5. प्राप्त अर्ज / कागदपत्रानुसार किमान अर्हताप्राप्त उमेदवारांना मुलाखतीसाठी वेळ / दिनांकाबाबत भ्रमणध्वनी तसेच ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.
6. मुलाखत व अनुभव इत्यादींवर आधारित निवडलेल्या उमेदवारास महामंडळाच्या सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार अटी व शर्तीनुसार नियुक्ती पत्र दिले जाईल.
7. नियुक्ती पत्र दिलेल्या उमेदवारास 6 महिन्याचा कालावधी संपल्यावर वस्त्रोद्योग महामंडळाची आवश्यकता असल्यास पुन्हा पुढील तात्पुरत्या ठराविक कालावधीसाठी नियुक्तीपत्र दिले जाईल.

या प्रक्रियेसंदर्भातील अंतिम निर्णय महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाचा राहिल.

सही/-

(श्रीकृष्ण बी. पवार)

व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ

मर्यादित